म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय क्या. वा.
दा. क्र. ५७०२

# वसंत गौर

IRBK-0103142
IRBK-0103142

५१३०७२

म. ग्रं. सं. ठाणें
षय
नं. १३६

# वसंत गौर



नी. आ. ला. २६५ २५।आर
वा. क्र. १९४६
३९४२

आमचे सण-८

# वसंत-गौर

लेखिका :

सौ. मालती दांडेकर

संग्रहालय ठाणे
३९४२
ना. वा.

प्रकाशक :
गोविंद वामन कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
कोल्हापूर.

मुद्रक :
हे. बा. गुर्जर,
आयुर्विद्या मुद्रणालय,
१।२ सदाशिव, पुणें २.

IRBK-0103142

किंमत ४ आणे.

महाराष्ट्र ग्रंथभाण्डार, कोल्हापूर ' याची

# बाल--मित्र--माला

या बालवाङ्मयाचे वाचक लिहितां वाचतां येणारीं ९ ते १२ वर्षां-पर्यंतचीं मुलें मानलीं आहेत. कल्पनेच्या घोड्यावर बसून भरधांव धांवण्याची बालमनाची प्रवृत्ति असते. या प्रवृत्तीला उत्तेजन द्यावें, तिचे कोड पुरवावेत म्हणून त्यांच्या हातीं अद्‌भुतरम्य गोष्टी द्याव्या असें कित्येकांचें मत आहे, तर कित्येक शिक्षणशास्त्रज्ञ असें मानतात कीं मुलाच्या मनाची कळी उमलत असतांना या सृष्टींतला प्रत्येक पदार्थ, प्रत्येक घटना आणि प्रत्येक दृश्य त्याला अद्‌भुतरम्यच वाटत असतें. ही अद्‌भुतरम्यता जगाशीं होत असलेल्या त्याच्या परिचयाच्या नाविन्यामुळें उत्पन्न होत असते. नाविन्याची, ताजेपणाची ही बालमनाची अवस्था आपण शेवटपर्यंत टिकवून धरीत नाहीं असा साधारणतः अनुभव येतो. नाहींपेक्षां मुला-प्रमाणेंच ही सृष्टि आम्हांलाहि क्षणोक्षणीं अद्‌भुतरम्यच वाटत राहिली असती. मुलांची ही वृत्ति म्हणजे त्यांच्या बुद्धीची सृष्टीशीं भेट करून देणारें वाहनच आहे असें म्हणतां येईल. ज्या ज्या पदार्थाकडे मूल आकर्षित होतें त्याला पचवून पूर्णपणें आत्मसात् करण्याची त्याच्या बुद्धीचीहि धडपड चालू असते; म्हणून परिणामीं बुद्धीला न पटतील अशा अनैसर्गिक गोष्टी त्याच्यापुढें ठेवणें हें त्याच्या सर्वांगीण विकासाला अनुकूल होत नाहीं.

ही विचारसरणी पुढें ठेवूनच 'बालमित्रमाले'चीं सर्व पुस्तकें निघतील. आज प्रथम या मालेंतून ' आमचे सण ' आम्हीं मुलांना वाचावयास देणार आहोंत. मजमजेनें मुलाच्या साध्या, सोप्या भाषेंत गोष्ट सांगतां सांगतां आमच्या सणांचें, उत्सवांचें आणि व्रतांचें ज्ञान मुलांना अगदीं अभिनव पद्धतीनें करून देऊन त्या सणादिकांचा आजच्या शास्त्रीय युगांत आपण कसा उपयोग करून घ्यावा हें मुलांच्या मनावर सहज बिंबविण्याचा उद्देश हीं पुस्तकें लिहून घेतांना पुढें ठेवला आहे. मनोरंजन, सुसंस्कार व ज्ञान यांचा लाभ या पुस्तकांच्या वाचनानें मुलांना व्हावा अशी अपेक्षा बाळगली आहे.

आ आ.आ. ६९६५ २५।३।८
१०२८३

# वसंत--गौर

आज उर्मिलाबाईच्याकडे कांहीं तरी गडबड आणि धांदल चाललेली होती. गडीमाणसं अंगण झाडून सडा टाकूं लागलीं होतीं. फुलझाडांच्या कुंड्या माळ्यानं उचलून आंत नेल्या होत्या. घरांतल्या मुलींनीं उत्तम फ्रॉक घालायचे असं ठरवलं होतं अन् कलावती तर रांगोळ्या काढायला लागली होती दारासमोर.

समोरून गॅलरींतून छोटा उल्हास अन् वसंत दोघेही पहात होते सारं. कांहीं वेळानं तर उर्मिलाबाईच्या घरांतून खमंगसा वास येऊं लागला, तेव्हां त्यांना मुळींच राहवेना. तोंच खालून धाकट्या गौरीनं ओरडून म्हटलं:—

"वसंतदादा, ए उल्हास, चला, आतां आईनं बोलावलंय!"

"कशाला ग? काय आहे आज? ताईचं लग्न ठरलं का?"

हें ऐकून रांगोळ्या काढतां काढतां कलावतीनं वर मान उचलून म्हटलं, "हं हं! उल्हास, माझ्या लग्नाची घाई तुलाच झाली आहे वाटतं?—पण आज दुसरीच गंमत आहे हो आमच्या घरीं. वसंत-गौरीचा उत्सव आहे बरं का. चला लौकर. या फराळाला बघूं."

वसंत धांवत धांवत आला, उल्हास उड्या टाकीतच जिना उतरूं लागला. वसंत घरांत शिरतां शिरतां म्हणतो कसा—

"ए, गौरी, आज तुझा न् माझा दोघांचा उत्सव आहे बरं का ग. कलाताई, चला. करंज्या ऊन ऊन द्या या लहान वसंत–गौरीला."

सारींचं हंसली व तो घोळका हंसत आंत शिरला.

अहाहा ! काय सुंदर दिसत होता तो देखावा ! बिचाऱ्या उल्हास–वसंताला आई नव्हती न् बहीणही नव्हती ! चैत्रा गौरी आरास त्यांनीं कधीं पाहिली नव्हती. कोण गौर मांडणार होतं त्यांच्याकडे ? आचारी होता न् बाबा होते; ते काय गौरीचा उत्सव करणार ? ते दोघे पहातच राहिले.

पायऱ्यापायऱ्याची पेट्यावर पेट्या ठेवून रचना केली होती, अन् वर सफेत चादर टाकली होती. वरच्या बाजूला गौरीची मूर्ती होती. तिच्या आजूबाजूला कापडाचे पंखे होते; कैऱ्यांचे पानांसकट झुपके शोभत होते. अनेक चित्रं मांडलीं होतीं. कला कौशल्यांचं तें एक प्रदर्शनच होतं, असं म्हटलं तरी चालेल. कलावतीनं कागदाचं एक सुबक देऊळ केलेलं किती छान दिसत होतं मधोमध ! लोण्याचा महादेवही उर्मिलाबाईंनीं केला होता. देवीपुढें थंडगार पन्हं–कोशिंबिर होती, खिरापत होती शिवाय करंज्या-लाडू-चकल्यांचीं ताटं पण होतीं. विणलेले रुमाल, हातानं काढलेली रेशमी बेलबुट्टीची तसबीर, हाताचीं चित्रं....सगळंच मोठं छान होतं. कुंड्यांनींही शोभा बरीच वाढवली होती....किती छान गौरीची आरास ही ! सगळं कसं हिरवंगार न् थंड वाटलं मुलांना. डोळाभर गौर पाहून मुलं आंत वळलीं.

ओळीनं वसंत, उल्हास, गौरी, कला यांचीं पानं मांडून उर्मिलाबाईंनीं त्यांना खुसखुशीत चकल्या, करंज्या, वाढल्या.

एकेक ग्लास भरून ताजा उसाचा रसही दिला अन् खरबु-जाच्या फोडी, कोशिंबीर, हरबऱ्यांची उसळ हेही पदार्थ गोष्टी करीत प्रेमानं वाढले. वसंताला आपल्या आईची आठवण झाली एकदम उर्मिलाताईकडे पाहून.

जरीचें सुंदर कोरें पातळ त्या नेसल्या होत्या व गळ्यात, हातांत दागिने झळकत होते त्यांच्या. मोठ्या आंबाड्यावर सुरेख मोगरीची वेणी किती पण शोभत होती ! त्यांना वसंत एकदम म्हणाला---

" मावशी, तुम्हीच आज त्या गौरीसारख्या छान दिसता. माझी आई अशीच होती बरं का. मावशी, इतकी कां हो ऐट केलीय् तुम्ही ? कोणी येणार का आहेत फराळाला ?"

उर्मिलाताईंना वाईट वाटलें. बापडीं मातृहीन मुलं ! त्या कळवळून म्हणाल्या, " बाळांनो, आज कनी चैत्रागौर आहे ना, म्हणून हळदकुंकू आहे आमच्या घरीं. खूप बायका येतील संध्याकाळीं. हीं बघ मीं फुलं आणलीं आहेत वासाचीं; झालंच तर, हे भिजलेले हरभरे आहेत; याच्या मी ओटया भरणार आहें. कोशिंबीर आवडली का ? तीही देणार आहें साऱ्यांना. हा चैत्राचा महिना आला ना कीं प्रत्येक घरीं एक दिवस अशी गौर करतात बरं का. मी शंभर बायका बोलावल्या आहेत. आणखी तुम्ही जाऊं नका हं घरीं. सगळ्या जमल्या कीं एक छोटंस भाषणही मी करणार आहें. मग कलावती एक गाणं म्हणून दाखवील, मग एक संवाद आहे तो कला आणि कलाच्या मैत्रिणी करतील; मग ह्या वेड्या गौरीचं 'तांडवनृत्य' व्हायचं अन् मग खलास कार्यक्रम.

गौरी खातां खातां एकदम रुसून म्हणाली:—

" हे काय ग आई? मी वेडी आहे कां? अन् "ताडवनृत्य" काय ग म्हणतेस आम्हांला? भास्तरनीं सांगितलंय, त्याचं नांव 'कथ्थकडान्स' समजलं ना? अशानं आम्ही नाहीं करणार!"

" बरं, बरं. रुसूं नका. मी आपली गंमत केली हो या गौरीची. पण वसंता, उल्हास, इथंच राहा बरं का गंमत पाहायला तुम्ही. अरे, मुलगे म्हणून लाजूं नये. तुमचं गॅदरिंग नाहीं का होत? तसंच आमचं हें संमेलन आहे हो. पहिल्यादा जुनी चाल अशी कीं बायकांना, सासुरवासणींना घरांत खूप काम असायचं. धुणं-पाणी, सैंपाक, निवडणं, मुलांचं, सगळं त्याच करायच्या. बायकांनीं उगीच घराबाहेर आतांसारखं फिरायला किंवा नाटक-सिनेमाला, बसायला, सभेला जायची तेव्हा रीत नव्हती. अशी कोणी फिरणारी असली तर तिलाच नांवं ठेवायचा तो जुना काळ."

" मग बायका कंटाळत नव्हत्या का ग आई?" गुलाबदाणींत गुलाबपाणी भरीत कलेनं प्रश्न केला.

विड्याचीं पानं लावून ठेवतां ठेवतां आई म्हणाली—" हो तर! खूप कंटाळायच्या. म्हणून तर मंगळागौर, हरितालिका, वटपौर्णिमा, महालक्ष्मी, असं कांहीं असलं कीं त्यांना किती आनंद व्हायचा अगदीं! आई सांगते ना आमची. तुम्ही जशी दिवाळीची वाट पहात बसतां ना महिना महिना आधीं? तसं तिला होई. कारण या निमित्तानं कायती घराबाहेरची हवा लागायची सुनांना! दुसऱ्या बरोबरीच्या मैत्रिणी जमून हंसण्या खेळण्यात वेळ जायचा तो फक्त या निमित्तानं. पूर्वींचा हाच क्रम असे बायकांचा. आपले पूर्वज फार धोरणी होते. त्यांनीं बायकांची ही कुचंबणा ओळखून पुष्कळ सणावारांची रीत घालून

दिली. तुम्हीच पहा, दर महिन्यात दोन तीन तरी सण असतात, होय ना?"

"हो. गडे. या महिन्यांत पाडवा, रामनवमी, अन् हनुमान जयंती झाली अन् वसंत–पूजाही आहेच कीं रोज. पण, आई, 'वसंत–पूजेला अन् गौरीला पन्हं अन् कैऱ्याच कशाला पाहिजेत हो?"

"वा, तसं तर खूपच विचारता येईल." उल्हास म्हणाला.

"संक्रांतीला तिळगूळच कशाला लागतो हो? अन् रथसप्तमीला गुळाच्या पोळ्यांचीच काय एवढी ठराविक रीत? गंमतच वाटते बुवा आपल्याला!"

"वा! त्यांतही आपल्या पूर्वजांचं चातुर्य आहे हो. उल्हास, तूंच बघ, संक्रांत अन् रथसप्तमी दोन्ही येतात ऐन थंडींत. भाज्या, गाजरं, वांगीं, ओला हरभरा, गव्हाच्या लोंब्या, सारीं ऐन बहरात असलेलीच भाजी खायला अन तिळ–गूळ व गूळ-पोळी खायला शास्त्र सांगतं या वेळीं. या भाज्यांनीं उष्णता उत्पन्न होते शरीरांत. शिवाय तीळ उष्ण, गूळ उष्ण, अर्थात् थंडींत असे पदार्थ खावे, एवढा बोध घ्यावा आपण त्यांतून! प्रकृतीला हितकर गोष्टीचाही विचार आहे शास्त्रांत, खरं कीं नाहीं?"

"पण आई, पन्ह्याचा काय ग आरोग्याशीं संबंध?"

"अवश्य आहे. तूंच बघ, उन्हाळा किती असतो या महिन्यांत! यात तुम्ही कढत कढत चहा पितां. अशा वेळीं या ऋतूंत होणाऱ्या हिरव्या आंब्यांचं शीतल पन्हं किंवा थंडगार उसाचा रस तुम्हाला जास्त मानवेल अन् आल्हाददायक वाटेल कीं नाहीं, तुम्हीच पाहा!"

कला थोडीशी वरमून म्हणाली, "हो. चहाचं तूंच काढलं-यस् बरं का. पूर्वजांना कधीं माहीत होता ग तो ?"

"पण एकंदरींत त्यांची आरोग्याची दृष्टि आहे हें तर खरं ना ? 'चातुर्मास' पावसाळा, हवा जरा दमट, रोगट झालेली. अशा वेळीं कांदे, वांगीं इत्यादि वातुळ पदार्थ खाऊं नयेत, हा नियम किती चतुरपणाचा आहे बरं !

महिन्यांतून दोन एकादशांना कडकडीत उपवास सांगितला आहे तो प्रकृतीच्या हितासाठीं. हल्लींचे डॉक्टरही म्हणतात, दोन-लंघनं केलीं पाहिजेत महिन्यांतून. त्यांचं न् आपल्या पुराणांचं मत एकच !"

वसंत टाळी वाजवून म्हणाला, "पण आतां तर एकादशी न् दुप्पट खाशी असं झालं आहे ! आमचा आचारी एकादशी करतो. रताळ्याचे लाडू, भगरीचा शिरा, बटाट्यांची भाजी, शिंगाड्याचं थालिपीठ असा कितीतरी ताटभर फराळ करतो. ही कसली एकादशी ? अन् यानं कशी तब्येत बरी होणार ?"

"अरे, आईबापांनीं सांगितलं तरी वात्रट मुलं जशीं प्रत्येक गोष्ट ऐकतातच असं नाहीं, तसंच आम्ही आमच्या संस्कृतीप्रमाणें वागावं असं पूर्वज म्हणत होते. पण प्रत्येकजण ऐकेलच असं कुठं आहे बाबा ? धुडकावून लावणारेच फार दिसतात. शितळ शिमगा पहा, ऐन उन्हाळ्यांत येतो, तेव्हां मुलांना मल-मलचे सद्रे वांटावे अशी चाल आहे. रंगपंचमीसारखे पाण्याचे सण तेव्हांच येतात. दिवाळीच घ्या. पेरणी संपलेली, शेतकरी मोकळे अन् निश्चिंत असतात. बरं, पणत्या कुणीही कुठंही लावूं शकतो. घटकाभर तरी आनंद करावा, जीवनांत बदल असावा, हा हेतु या सणा–वारांचा...."

"अय्या ! पांचसाडेपांच झाले आई !"

"हो, जमतीलच आतां हळुहळूं. आटप कला. बैठक घाल बघूं.

सुमारें ८०-९० बायका जमल्या होत्या तिथं, उत्तमोत्तम जरीकाठी पातळें झळकत होतीं. दागिन्यांचें सोनें चमकत होतें, मोत्यांच्या नथा नाकांत झगमग करीत होत्या अन् केसांतून फुलाच्या वेण्या होत्या. गौरीजवळ एक लहान टेबल व खुर्ची असून खुर्चीवर एक गंभीर स्त्री बसली होती. प्रथम उर्मिलाबाई उठून म्हणाल्याः— "भगिनींनो ! आज माझ्या घरीं आपण साऱ्याजणीं हळदकुंकवाला आला आहांत. हळदकुंकूं हें चैत्रात प्रत्येकाकडे होत असतंच. पण आपल्या या समारंभांत आणखीही शिस्त व आकर्षकपणा आणावा या दृष्टीनं मी थोडा त्या पद्धतींत बदल केला आहे. जुन्या चांगल्या गोष्टी घ्याव्या व आपल्या बुद्धीप्रमाणं नव्या चांगल्यांची त्यांत भर घालावी, अन् आपलं जीवन सुखकर करावं. खरं ना ? पूर्वी आपण जमत होतोंच, पण एक बाई ४ वाजतां येई तर एक आठाला ! मिळून कुणाशींच बोलायला मालकीणीला सवड राहात नसे. आज आपण या निमित्तानं संमेलनच करूं.

प्रथम मनोरंजन म्हणून आमच्या गौरीचं हावभावाचं गाणं अन् नाच होईल, मग कला एक गाणं म्हणेल. मग हळदकुंकूं या विषयावर थोडी चर्चा, अन् आपल्या आजच्या अध्यक्ष सौ. कमलिनीबाई याचे चार शब्द. मग हळदकुंकूं-रसपान. म्हणजे हा समारंभ पुरा होईल !" उर्मिलाबाई थोड्या थांबल्या अन् चहूंबाजूला पहात म्हणाल्या—

"मैत्रिणींनो, आतां आणखी एक गोष्ट सांगून मी आपणांस चकित करणार आहें. हें संमेलन तर खरंच. पण कालानुरूप

आपण आपले विचार बदलले पाहिजेत, खरं ना ? विचारी पुरुष गांधी, नेहरू, इत्यादि स्वतंत्र नव्या हिंदुस्थानाच्या पुढाऱ्यांच्या उपदेशाप्रमाणं वागतात अन् स्त्रियांनीं मात्र केवळ सितासावित्रींचीं व्रतं पाळीत बसावं, हें योग्य नाहीं. आपणही जमेल तो हातभार चालू सुधारणांना लावला पाहिजे. म्हणून आज एक नवीन चांगली गोष्ट केली आहे. पलीकडे हरिजन वस्ती आहे. तेथल्या बायकांच्या घरीं काल जाऊन मीं त्यांना हळदकुंकवाला बोलावलं आहे. त्या आल्या आहेत. कला, जा. त्या सगळ्या नव्या मैत्रिणी समोरच्या शाळेपाशीं थांबल्या आहेत. घेऊन ये त्यांना. " उर्मिलाबाई थाबल्या.

" हरिजन बायका इथं जमणार? इश्श ! सारा मेला भ्रष्टाकार ! विटाळचंडाळ नाहीं का व्हायचा? अन् त्या मेल्या महारचाभारणी आम्हांला खेटून बसणार कीं काय? अगबाई, आमचा अपमानच आहे हो हा. काय हें वागणं ! आम्ही आलोंच नसतों तर बरं झालं असतं बाई यापेक्षां...."

इत्यादि कुजबूज, ' अय्या ! इश्श ! ' चे उद्गार, ऐकूं येऊं लागले. नाखूष चेहरे....अन् कित्येकींच्या कपाळला तर आठीच पडलेली. हें सर्व दृश्य पाहून उर्मिला मनाशींच हसली. असं होणार हें सर्व जाणूनच होती मुळीं ती. ती शांतपणें म्हणाली—

" मी जाणतें, पुष्कळांना माझं हें वागणं आवडलं नाहीं. पण मी म्हणतें, मी कांहीं प्रश्न विचारूं का ? "

" विचारा कीं. " देशमुखांच्या अक्का रागीटपणें उत्तरल्या.

" अक्का, तुम्हीच सांगा, परवा तुमच्या मुलीच्या आजारीपणात तुम्ही कोणती नर्स ठेवली होती बरं ? "

" कां ? त्याचा काय इथं संबंध ? होती एक ख्रिश्चन जेनी नांवाची. पंधरा दिवस तिनंच सेवाचाकरी केली बरं चांगली ! "

" बरं, इंदुताई, परवां तुम्ही आजारीपणांत कोणत्या डॉक्टराचं औषध घेतलं अन् जीवावरच्या दुखण्यांतून उठलात ! "

" अय्या ! तें आतां काय विचारता भलत्या वेळीं ? आतां विचारतांच, तर सांगतें, नवे ते जॉन्सन डॉक्टर आहेत ना ख्रिस्ती, त्यांनीं मला वांचवलं बरं ! "

हंसून उर्मिलाताई म्हणाल्या—

" अन् रमाकाकू, तुमच्या ऑफिसांत कोण नवा रेशन ऑफिसर आलाय् तो ? परवा अगदीं तुमच्या घरीं माडीवर चहाफराळ करीत होता ! तो कोण बरं ? नांव काय त्याचं—? "

" कांबळेसाहेब तो. अहो त्याची कृपादृष्टि आहे म्हणून चहा तरी मिळतोय् रोज ! साखऱ्या दिलान् त्यानं आमच्या मैत्रीखातर ! पण हळदकुंकवाशीं कांबळेसाहेबाचा संबंध काय ? हें नाहीं कळत मला—" नवलानं त्या उद्गारल्या.

" बरं, चिमणाताई, परवा प्रवासांत गाडींत आपण दोन दिवस होतों तेव्हां गार्ड कोण होता ? चहा देणारा कोण होता ?"

" असाच एक, काळा ख्रिश्चन ! अन् चहावाल्याची तर जात विचारायलाच नको—मराठा असेल—पण त्याचं काय ?"

" थांबा. माझ्या प्रश्नांचीं उत्तरं तुम्ही छानच दिलींत. "

उर्मिलाबाई समाधानानं हसून म्हणाल्या– 'आतां मात्र तुम्हींच मान्य केलं आहे कीं हरिजनांना तुम्हीं अस्पृश्य समजत नाहीं कधीं ! अक्का, ख्रिश्चन जेनी अन् डॉक्टर जॉन्सन हीं दोन्हीं पूर्वाश्रमींचीं अस्पृश्य बहीणभावंडं आहेत. येथें पूर्वी विठू महार

होता, त्याची अनाथ मुलं—जनी अन् जानवा म्हणून होती. त्यांना कुणी थारा देईना, तेव्हां ख्रिस्ती मिशननं त्यांना ख्रिश्चन करून घेतलं आहे! ख्रिश्चन झाल्यामुळें त्याच महार बहीण भावंडांच्या हातून तुम्हीं खुशाल औषधं घेतलींत! त्या जेनी बाईला तर घरांत ठेवून घेऊन तिची सेवा घेतलीत! कांबळे-साहेब तर जातीनं चांभार आहेत. त्यांना तुम्हीं घरांत आणून आदर करूं शकतां. अन बपाड्या हरिजन मायभगिनींना तेवढं दूर कां लोटतां? त्यांनीं तुमचीं अंगणं झाडावीं, तुमच्या पाया-साठीं पायतणं करावीं, कातडीं कमवावीं, गांवांतली घाण दूर करावी अन् त्यांना तुम्हीं 'माणूससुद्धां' समजत नाहीं हें काय बरं?"

जरा थांबल्या उर्मिलाताई. सर्व लक्षपूर्वक ऐकत होत्या. त्या पुढें म्हणाल्या—

"देवालासुद्धां भेदाभेद आवडत नाहींत. भक्ती, श्रद्धा असली कीं झालं! त्यानं विठ्या महाराचं रूप घेतलं होतं दामाजीसाठीं! चोखा मेळ्याला, अस्पृश्य हरि[illegible]नं पोटाशीं धरलं होतं! देवसुद्धां माणुसकी पाहतो; जातीचं अवडंबर माजवीत नाहीं. देवीला, वसंत-गौरीला सुद्धां आजचं आपलं वागणं आवडेल! खरं सांगा, हा महार, हा चांभार, हा वाणी, हा धनगर, हा कोळी, हा साळी असे लचके हिन्दु प्रजेचे काढून वेगवेगळे केले तर आपलं सामर्थ्यही तुटूनफुटून तुकडे होत नाहींत का? आणखी एक विचारतें. तुम्हांला कुत्रींमांजरं सैंपाक घरांत चाल-तात. त्याहूनही हरिजन निंद्य आहेत काय? इतकं दूर कां ढकलतां तुम्हीं त्यांना? आपलेच ते, हिंदु आहेत. मग विटाळ कां?"

अक्का म्हणाल्या—“ते गलिच्छपणं राहतात, मांसमच्छर खातात, अंघोळ करीत नाहींत, गुरं कापतात, म्हणून.”

उर्मिलाबाई गंभीर होऊन म्हणाल्या—

‘पण जेनी अन् जॉनसन तर डॉक्टर नर्स होऊं शकले. त्यांना शिकवूं ना आपण स्वच्छ राहायला. आज या देवीच्या सन्मानासाठीं मी एक ‘दलीतोद्धार’ मंडळ स्थापन करणार आहें. शिकवून, त्याना आपण स्वच्छ राहायला दाखवूं. त्याना प्रेमानं अज्ञानाचे परिणाम सांगूं. खात्रीनं त्या शिकतील. बघा, त्या एके-कजणी किती स्वच्छ अंघोळ करून टापटीपीनं आल्या आहेत! आगगाडींत नाहीं का वाटेल तीं माणसं खेटून बसत? तिथं कुठं विटाळ आहे? आपण ह्या विटाळचंडाळाच्या कल्पना सोडूं या! अमंगल, अशुभ, खोटेपणा, दांभिकपणा, अहंकार यांचाच विटाळ मानीत जाऊं यापुढं! मी दर आठवड्याला हरिजनवस्तींत जाणार आहें. याल का कोणी माझ्याबरोबर? हात वर करावे त्यांनीं— !”

पांच उत्साही तरुण मुली व गृहिणींनीं हात वर केले तेव्हां उल्हासानं उर्मिलाबाई म्हणाल्या—

“वा! वा! सुरवातीला पाच मैत्रिणी! छान. सुरुवात झाली हेंच भाग्य! चैत्र महिना, नव्या वर्षाचा, नव्या वसंताचा, नव्या पालवीचा, नव्या भाग्याचा महिना! आपल्या देशाचंही भाग्य उदयाला आलं आहे. स्वराज्य दारीं आलं आहे. आपाप-सांतले हे असले जातीपातीचे, बारीक सारीक भेद विसरून मनं नवीं, प्रसन्न, ताजीं अन् प्रफुल्ल करूं. अन सर्वांची एकी करूं. हाच यंदाचा वसंतोत्सव!”

व्याख्यान संपलं. सर्वांनीं टाळ्या वाजवल्या. उर्मिलाबाईंनीं

नव्या हरिजन मैत्रिणींना आंत बोलावून प्रेमानं स्वतः हळदकुंकू, अत्तरगुलाब, ओटया, सगळं दिलं व स्वच्छतेनं राहाण्याबद्दल देवीची शपथ घातली. कित्ती आनंदित झाल्या होत्या त्या बापड्या गरीब हरिजन स्त्रिया! एक हर्षित स्वरात उद्गारली—

" आपुन थोर मानसं, आमाला जवळ क्येलं, आतां आमीच काय, आमचा ' बा ' न्हाईका सवच्छ व्हानार जी ? —"

अन् मग कौतुकानं कांहीं हसल्या अन् कांहीं दुराग्रही रागानंहि पाहूं लागल्या! उर्मिलाबाई मात्र प्रसन्न होत्या अगदीं. नंतर, गौरीचा नाच फारच सुरेख झाला. कलावतीचं गाणंही झालं व चर्चेला सुरवात झाली. त्या गांवांत हळदकुंकवाची ही पद्धत नवीच होती म्हणून सर्वजणींना हा कार्यक्रम नवलाचा वाटत होता. तरीही फार आवडला! पुष्कळजणींनीं चर्चेत भाग घेतला होता.

सौ. कमल—मला वाटतं, हल्लींच्या दिवसांत हें हळदकुंकू म्हणजे एक फार खर्चाचंच कलम होतं. हरभरे रुपयाला शेर! डाळ रुपयाला अशीच! साखर दिसत नाहीं. रॉकेल नाहींच. यातून काय मार्ग काढावा ? हळदकुंकू सौभाग्याचा समारंभ. करायचं नाहीं म्हटलं तर अशुभ वाटतं.

सौ. मालती—त्याला एक फारच चांगला उपाय एका गांवात माझ्या आढळण्यांत आला हो! तो म्हणजे ५-६ घरांच्या बायकांनीं मिळून एकत्र समारंभ करावयाचा अन् खर्च वांटून द्यायचा. म्हणजे एका घरीं जर २५ रुपये खर्च होतील तर पांचजणींनीं भाग घेतल्यास फक्त ५ रुपये पडतील. फिरून एकटीला दगदग फार होते तीही वांटली जाईल.

सौ. उषा—हो. ही कल्पना द्यायला हरकत नाहीं! पण काय

बाई जुनीं पुराणीं तींच तींच चित्रं काय तीं मांडायचीं ! जिकडे तिकडे तेंच ! पेट्या रचून चादर अंथरून मांडायच्या पेटींतल्या भावल्या न् कुत्रीं माजरं ! इश्श. यांत आतां मुळींच उत्सुकता राहिलेली नाहीं.

सौ. आशा–पण यांत तेंच मांडावं अन् तसंच मांडावं म्हणून कोण म्हणतं ? मी तर म्हणते, हें कलाकौशल्याचं प्रदर्शन असतं. तऱ्हेतऱ्हेच्या कागदाच्या, कापडाच्या खेळण्यांनींही गौर छान दिसेल. उर्मिलाबाईंनीं लोण्याचा महादेव केला आहे, किती छान दिसतो ! एके ठिकाणीं मी झोपाळ्यावर लुगडें नेसवून गौर बसवलेली पाहिली. तर दुसऱ्या एका घरीं कापडाच्या हत्तीवर गौर बसली होती थाटांत !

सौ. इंदु–हो. कुठं कागदाचीं फुलझाडं करून ठेवतात तर कुठं भरत काम असतं. यांत घरांत मुलांनीं काढलेलीं चित्रं, कलाकृतीही असाव्या. वाळू काचेवर घालून हिरव्या रंगाचे कागद टाकून तळ्याचाहि देखावा करतात. मी तर म्हणतें, प्रत्येक घरचं हें ‘कलाप्रदर्शन’ असावं. तसं तें असतंही बऱ्याच ठिकाणीं.

सौ. नीला—पण वसंत-गौरीचा उद्देश काय, हें नाहीं लक्षांत आलं.

उर्मिलाताई:—( हंसून ) तें अध्यक्ष सांगतील. त्यांनीं सांगावं ही विनंती.

अध्यक्ष उठून म्हणाल्या:—

“ हळदकुंकवाची ही अगदीं नवी पद्धत मला फार आवडली. आपलं हें संमेलनच असतं. पूर्वीं सभासंमेलनं नव्हतीं म्हणून अशा निमित्तानं आपल्या आजीपणजी जमून एकमेकींच्या भेटी-गाठी घ्यायच्या व एकमेकींच्या विचारांचा, ज्ञानाचा अनुभव

दुसरीला मिळायचा. त्याप्रमाणं आज झालंय्. प्रत्येक जणीचे विचार कळले. सुधारणेचे मार्ग समजले. प्रगतीची इच्छा दिसून आली. तेव्हां या संमेलनाचा उद्देश सफल झालाच एक !

दुसरा हेतू. रोज रोज तेंच काम करून कंटाळा येतो ना ? सासरीं खूप दिवस राहिलं कीं एकदां माहेरीं जाऊन यावंसं वाटतं. रोज रोज भात आमटी झाली तर एक दिवस तरी झुणकाभाकरी खावीशी वाटतेच ना ? आपलंही आयुष्य रोज रोज सैंपाक–पाण्यांत, घरकामांत, त्याच त्याच गोष्टी बोलण्यांत, जात असतं ! त्यांत बदल म्हणून हे सणवार अन् उत्सव असतात. मनोरंजन व्हावं, मन ताजंतवानं व्हावं, कामाचा शीण जावा, हा हेतु याही वसंतोत्सवाचा आहेच. पहा ना आपला एक तास किती सुंदर प्रकारानं गेला तो !

वसंताची पूजा म्हणजे सृष्टीचीच पूजा ! किती नवीं फुलं येतात, पान न् पान हिरवंगार दिसूं लागतं ! कालिंगडं, खरबुज, काकड्या, ऊंस, आंबे या फळांचं देणं सृष्टि देते. त्याचा मान ठेवायचा म्हणून पन्ह्याला, या सर्व गोष्टींना महत्त्व; शिवाय या उन्हाळ्यांत त्या किती शीतल वाटतात व आराम देतात हें ठाऊकच आहे तुम्हाला. गौरीपुढचे पंखे बघा, थंड पन्हं बघा, किंवा उसाचा रस घ्या अगर पानाफुलांच्या आराशीनं सजलेली ही वसंतगौर पहा. 'वासंतिक सृष्टी'च घरांत आली आहे असं वाटतं अन् मन उल्हसून जातं.

उर्मिलाताईंचा हा प्रयत्न आपणही आचरणांत आणूं. आतां आणखी एकदोन गोष्टी सांगून मी निरोप घेणार आहे. आजचा हा हरिजन स्त्रियांना बोलावण्याचा उपक्रम फारच स्तुत्य आहे. समजा, एका शरीराचे पाय तोडून दूर फेकले, हात तोडून लांब

टाकून दिले तर शरीर निरुपयोगी नाहीं का होणार? तसंच हिंदी तेवढे एक. त्यांचे जातीजातींचे तुकडे लचके काढून आपला समाज अधिक दुबळा होतो. आपण हे नवे विचार घेऊं व हरिजनांच्या सुधारणेचा प्रयत्न करूं.

सामुदायिक हळदकुंकूं याहूनही मोठ्या प्रमाणावर व्हावं. ५०–५० घरां मिळून एक. जसा गणपतीउत्सव ५ दिवस चालतो, व्याख्यानं, पोवाडे, प्रवचनं इत्यादींची योजना असते, तसा आपण गौरी–उत्सव करावा. कांहीं दिवस तरी स्त्रियांसाठीं बोधपर माहितीचीं व्याख्यानं मुद्दाम करावीं. वसंत व्याख्यान-माला असतात ना, तशी या महिनाभर माहितीपूर्ण व्याख्यानांची माला गुंफावी अन् आपल्या ज्ञानांत कांहीं वाढ व्हावी. फक्त मनोरंजन हें आजच्या काळाला बरं नव्हे. तर इतर राष्ट्रांत काय चाललं आहे हेंही समजून घ्यावं अन् मागासलेले विचार सुधारावे अशा प्रकारची ही संमेलनं खूप मोठ्या स्वरूपांत होतील तर किती छान होईल? हा समारंभ धार्मिक आहे, पवित्र आहे त्याला आपण सामाजिक अन् स्नेहवर्धकही करूं, एकमेकींचं प्रेम, मैत्री वाढवूं, अन् घरोघर वसंत-गौरीप्रमाणं फुललेलं मन नेऊं, आनंद वाढवूं, हीच आजची वसंत-गौरीची पूजा. ज्ञानवर्धन हाच तिचा गौरव.''

टाळ्यांच्या कडकडाटांत अध्यक्षांनीं भाषण संपवलें. मग हळद-कुंकूं, अत्तर–गुलाबाची एकच दाटी झाली.

रात्रीं उसाचा रस, पन्हं अन् फराळाला. वसंत–उल्हासचे वडील आले होते व आणखी कलेच्या वडिलांचे स्नेही आलेले होते. सारे म्हणत होते:

'वा! दाजीकाका, उर्मिलावहिनींचं हळदकुंकूं फारच नमु-

नेदार झालं म्हणतात. खरंच आमच्या सर्व सणांचं अशा नव्या विचारांनीं सुशिक्षित भगिनी सौंदर्य वाढवतील, तर मुलाना कितीतरी चांगल्या गोष्टी शिकतां येतील त्यापासून. धर्माची न् मैत्रीची शिकवण एकदम."

उल्हसून वसंत—उल्हास म्हणाले— "खरंच, आज आम्ही किती नव्या गोष्टी शिकलों यांच्या या हळदकुंकवापासून!"

अन् कला म्हणाली— "मलासुद्धां 'गौर कशी, कां, कोणत्या तऱ्हेनें करावी हें छान कळलं, दादा. मी आतां एक निबंध लिहीन यावर. आई किती छान कल्पना काढते, दादा, नाहीं का हो?" दाजीकाकांनीं उर्मिलाताईकडे पाहून हसत म्हटलं—

"आज काय प्रत्येकाकडून अभिनंदन चाललं आहे. गौर पावली बरं का तुम्हाला! बाकी असंच दरेक धार्मिक गोष्टीला चातुर्यानं मनोवेधक स्वरूप देण्याबद्दल मलाही अभिनंदन केलं पाहिजे."

उर्मिलाताई प्रसन्नतेनें फक्त हसल्या. पतीच्या त्या दोन सहानुभूतीच्या शब्दांनीं दिवसाभराचे त्याचे सारे श्रम जणुं नाहींसे झाले. सर्व मुलें आदरानें पाहात होतीं, मोठीं माणसें प्रेमानें जमून बोलत होतीं व चैत्रागौर आपल्या मोठ्या आरासयुक्त शोभेंतून जणुं उर्मिलेला आशीर्वाद देत होती. किती हें गोड दृश्य! वसंत-गौरीचें हेंच खरें पूजन, नाहीं का?

३०८२

# बाल--मित्र--माला

या मालेच्याद्वारा लहान मुलांना रुचतील व पचतील असे विषय साध्या, सोप्या भाषेंत पण आकर्षक मांडणी करून समजावून द्यावेत, असा हेतु मनाशीं धरला आहे. यांतील पहिला प्रयत्न म्हणून या मालेचा 'आमचे सण' हा पहिला सर आम्ही ओंवण्यास प्रारंभ केला आहे.

हिंदुस्थानांत आम्ही सर्व लोक जे सण, उत्सव व व्रतें साजरीं करतों आणि आपल्या अनुकरणशीलतेमुळें व उत्सवप्रियतेमुळें मुलेंहि ज्यांत हौसेनें भाग घेतात अशा प्रमुख सणादिकांची माहिती मुलांना मिळावी असा उद्देश हीं पुस्तकें लिहवून घेतांना ठेवला आहे. त्यांत सणादिकांची पौराणिक वा ऐतिहासिक पूर्वपीठिका, स्वरूप सांगून काळ पालटल्यामुळें या सणांचा आज आपण कसा उपयोग करून घेतला पाहिजे याचीहि जाणीव आम्हांला मुलांत उत्पन्न करावयाची आहे. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून आमचीं मुलें निपजणार आहेत व तीं तशीं निपजावींत अशीच जाणीव व ध्येय ठेवून आम्ही हा सबंध बालवाङ्मय प्रकाशनाचा प्रयोग आरंभिला आहे.

## आमचे सण

तिळगूळ घ्या, गोड बोला
महाशिवरात्र
होळी
गुढी पाढवा
सोन्याचा दसरा
नाताळ
मंगलमूर्ति
वसंतगौर

## इतर

फुलराणी
गुलाबकळी
राया अथवा बाल मूर्तिकार
पुण्यश्लोक कस्तुरबा
हरितालिका

## प्रकाशनाच्या वाटेवर

### आमचे सण

नागपंचमी, सती सावित्री, राखी पुनव

महाराष्ट्र ग्रंथ भाण्डार, कोल्हापूर

# आमचीं नवीं प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ | अमोल आहेर : सौ. मालतीबाई दांडेकर | ३–०–० |
| २ | कार्ल मार्क्स व त्याचें कार्य : पंडित मुंडले | २–०–० |
| ३ | अपराध : ना. ल. व्हटकर | २–०–० |
| ४ | चित्रलेखा : मूळ लेखक—भगवतीचरण वर्मा<br>अनुवादक : सौ. मालतीबाई चोळकर | ३–८–० |
| ५ | स्त्रियांशीं हितगुज : महात्मा गांधी ( दु. आ. ) | २–०–० |
| ६ | आव्हान : पं. जवाहरलाल नेहरू ( दु. आ. ) | १–८–० |
| ७ | विद्यार्थ्यांशीं हितगुज : महात्मा गांधी ( दु. आ. ) | २–०–० |

## महाराष्ट्र ग्रंथ भाण्डार, कोल्हापूर


IRBK-0103142

IRBK-0103142

महाराष्ट्र ग्रंथ-भांडार, कोल्हापूर

यांची

बालमित्र-माला व इतर प्रकाशन

मुंबई व पुणें येथें मिळण्याचें

ठिकाण

अभिनव शारदा विहार मंडळ

वासुदेव बिल्डिंग नं. ३,
बरोज लेन, ठाकुरद्वार,
मुंबई २.

१२४३/२, शिवाजी-नगर,
डेक्कन जिमखाना,
पुणें ४.

कव्हर : श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, मुंबई नं. २